यवतमाळ दि. बुधवार ४ नोव्हेंबर २०२६

आजचे तापमान

कमाल	किमान
२८ से.°	२४ से.°

हवामानाचा अंदाज
थंड वातावरण

दैनिक लोकसूत्र

वर्ष - पाचवे • अंक १७४ • किंमत ३ रु. E-mail : Loksutra@gmail.com RNI NO.MAHMAR/2022/83119

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित



श्रीमती सुमित्राबाई ठाकरे कॉलेज ऑफ नर्सिंग

प्लॉट नं.पी.-३, एम.आय.डी.सी.एरिया, लोहारा, यवतमाळ

G.N.M. (३ वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) सायन्स विद्यार्थ्यांना प्राधान्य

A.N.M.(२ वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) फक्त मुलींकरिता

P.B. BSC NURSING
पात्रता : GNM

B.Sc. Nursing
४ वर्ष पदवी अभ्यासक्रम
पात्रता : HSC (सायंस) PCB ग्रुप मध्ये 45%
MH B.Sc Nursing CET
जागा : 40

ANM/GNM/B.Sc.(N)
प्रवेश नियमानुसार
शिष्यवृत्ती लागू



अधिक महितीकरिता संपर्क

टिप : शासकीय नियमानुसार स्कॉलरशिप लागू ANM, GNM व BASIC B.Sc. (नर्सिंग) करिता

9561537762, 9130645861

हास्यटोला



सुरेश राऊत (सुदंश)

न्यूज Crime



जुन्या भांडणावरून काठीने मारहाण

यवतमाळ : गावातील दोन कुटुंबांमध्ये किरकोळ कारणावरून ३१ ऑक्टोबर पूर्वी वाद झाला होता, या वादातूनच पुन्हा दोन्ही परिवारामध्ये शाब्दिक वाद निर्माण होऊन काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याची घटना नेर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिरसगाव येथे ३१ ऑक्टोबरला साडेचार वाजता घडली.

नेर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या शिरसगाव येथील मनोज कोंडबाजी परकाडे (४०) आणि गोपाल दादाराव पापळकर (२२) या दोघांचे काही दिवसांपूर्वी भांडण झाले होते. हे दोघेही सिरसगाव बस स्टँडवर मुंगसाजी पान सेंटर या ठिकाणी पान खाण्यासाठी आले. त्या ठिकाणी पुन्हा जुन्या कारणावरूनच वाद झाला. यात गोपाल दादाराव पापळकर यांनी मनोज परकाडे याला लाकडी काठीने डोक्याच्या मागे व छातीच्या उजव्या बाजूला मारहाण करून जखमी केले. तसेच शिवीगाळ करून जीवानिशी मारण्याची धमकी दिली. या घटना प्रकरणी फिर्यादी मनोज परकाडे यांनी तक्रार दिल्यावर पोलिसांनी आरोपी गोपाल पापळकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

'व्हीपीडीए' प्रणालीचा फटका, उपअभियंत्यांसह शाखा अभियंत्यांचा बेफिकिरीचा कळस, 'मार्च एन्डिंग'ला निधी समर्पित

'झेडपी' सिंचनचे साडेपाच कोटी 'लॅप्स'

केशव सवळकर

यवतमाळ : जिल्हा परिषदेच्या बेफिकिर प्रशासकीय कामकाजाचा फटका कंत्राटदारांना चांगलाच बसला आहे. तसेही सिंचन विभागाच्या कामात मध्यंतरी 'आनंदीआनंद'चोहीकडे अशी अवस्था होती. दरम्यान २०२४-२५ मध्ये १० कोटी ४१ लाखांच्या जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेतील बंधारे बांधकाम व दुरूस्ती कामाचा तब्बल पाच कोटी ४४ लाख १७ हजार १४३ रुपयांचा निधी 'व्हर्च्युअल पर्सनल डिपॉजिट अकाउंट' प्रणालीमध्ये मार्च एडिंगला लॅप्स झाला. आता झेडपी सीईओंनी सिंचनच नव्हे तर निधी समर्पित झालेल्या विभागांना नोटीसही बजावल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामकाजात दप्तरदिरंगाईचे असंख्य नमुने आहेत. राजकीय नेत्यांच्या निकटवर्तीयांनीच ठेकेदारी चालविली आहे. त्यात सत्ताधारी नेत्यांचे अगदी राईट व लेफ्टहॅण्ड मानले जाणारे मातब्बर कंत्राटदार आहेत. दरम्यान २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेतून सिंचन विभागाच्या अख्त्यारीतील कोल्हापुरी बंधारे व सिमेंट बंधाऱ्यांच्या बांधकाम व दुरूस्तीच्या (२७०२-७११८) या हेडखाली तब्बल १० कोटी ४१ लाखांच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली गेली. त्यातून आठ कोटी १७ लाख ९३ हजारांचा निधी वितरीत झाला. प्रत्यक्षात कामावर झालेला खर्च दोन कोटी ७१ लाख ८७ हजार ७४८ रुपये एवढा आहे. दरम्यान मार्च एडिंगला कंत्राटदारांनी केलेल्या कामांची देयके निघणे अपेक्षित होते. मुळात सिंचन विभागाच्या यवतमाळ, दारव्हा, पुसद व वणी या सर्व उपअभियंत्यांसह तेथील शाखा * पान ४ वर

बंधारे दुरुस्तीच्या कामाची देयके अडकली



पदाधिकारी, पत्रकारांना 'मकास'ची कामे

हल्ली राजकीय पक्षांच्या काही प्रस्थापितांनी ठेकेदारी चालविली आहे. झेडपी सिंचनच्या ४९ कामांमध्ये बहुतांश कामे मजूर कामगार संस्थेच्या नावावर असून सत्ताधारी पक्षातील काही तगड्या पदाधिकाऱ्यांसह पत्रकारांनाही या कामांचे वाटप झाले आहे. मात्र, त्यांचा निधी लॅप्स झाल्याने देयके काढण्यासाठी आता त्यांचा राजकीय नेत्यांमार्फत खटाटोप सुरू आहे.

४९ कामांच्या गुणवत्तेचा पोरखेळ

जिल्हा नियोजन समितीचा निधी खर्च मर्यादित वेळेत होत नाही. त्यामुळे दरवर्षी हा अखर्चित निधी जिल्हा परिषद सिंचन व इतर विभागांकडे वळवून सत्ताधारी गोटातील कंत्राटदारांना त्यांच्या सोयीची कामे दिली जाते. वास्तविक सिंचन पुनर्स्थापना या नावाखाली सिंचन विभागाने आजवर कितीदातरी आपल्या सिंचन योजनांवर निधी खर्ची घातला आहे. २०२४-२५ च्या जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेतून शून्य ते १०० हेक्टर क्षमतेपर्यंतच्या कोल्हापुरी बंधारे व सिमेंट बंधाऱ्यांच्या कामात केवळ गुणवत्तेचा पोरखेळ झाला आहे.

किती अन् कोणत्या कामांचा समावेश ?

जिल्ह्यात २०२४-२५ मध्ये झेडपी सिंचन विभागाअंतर्गत कोल्हापुरी बंधाऱ्याचे निर्लेखन करणे व आऊटपोर्शनची विशेष दुरूस्ती, फ्लॅकिंग पोर्शनची दुरूस्ती, नवीन सिमेंट नालाबंधारे बांधकामासह नालाखोलीकरण व रूंदीकरण, कोल्हापुरी बंधाऱ्यांची विशेष दुरुस्ती अशी ४९ कामे केली. त्यासाठी १० कोटी ४१ लाखांचा निधी दिला गेला. झालेल्या कामांमध्ये पुसद ४, महागाव १, उमरखेड ५, दिग्रस ५, यवतमाळ ५, राळेगाव १, कळंब ३, झरी ३, केळापूर ३, मारेगाव ३, वणी १, आर्णी २, दारव्हा ४, नेर ५, बाभूळगाव ४ अशी ४९ कामे आहेत.

२०२५-२६ ची ३१ कामे

झेडपी सिंचनने २०२५-२६ मध्ये शून्य ते १०० हेक्टर क्षमतेपर्यंतच्या लघु पाटबंधारे योजना बांधकाम व दुरूस्ती (२७०२-७१०९) या लेखाशिर्षाअंतर्गत यवतमाळ १, दारव्हा ५, पुसद ३, वणी २ अशी तीन कोटी २५ लाख आठ हजार किमतीची ११ कामे घेतली असून दोन कोटी ५९ लाख २६ हजारांचा निधी प्राप्त झाला. केवळ दोन कामे पूर्ण झाली. तर कोल्हापुरी बंधारे बांधकाम व दुरूस्ती (२७०२-७११८) या लेखाशिर्षाअंतर्गत यवतमाळ २, दारव्हा ८, पुसद ४, वणी १ अशी तीन कोटी ४२ लाख ८० हजारांची १५ कामे आहेत. दोन कोटी ६२ लाख ६४ हजार निधी प्राप्त झाला. मात्र, पूर्ण कामे २ आहेत. ५ योजनांच्या सर्वेक्षणासाठी (२७०२-ए ०४२)शिर्षाअंतर्गत ३ लाख प्राप्त झाले. ३१ कामांसाठी ६ कोटी ७० लाख ८८ हजार निधी असून प्राप्त निधी ५ कोटी २४ लाख ९० हजार आहे. वर्क आर्डर दिलेल्या ३१ पैकी ९ कामे पूर्ण झाली. १४ प्रगतीत तर ८ सुरू होण्याच्या प्रक्रियेत आहेत.

निवासी वसतिगृहाच्या विद्यार्थी संख्येवरही प्रश्नचिन्ह, सामाजिक न्यायच्या योजनांचा झेडपीत गोंधळ

'सेस'निधी विनियोगात समाजकल्याण 'फेल'

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाअंतर्गत सेसफंडासह दिव्यांगनिधी विनियोगाचा प्रश्न गंभीर बनला आहे. तत्कालीन समाजकल्याण अधिकारी पियूष चव्हाणांच्या बदलीनंतर सामाजिक न्यायच्या सहाय्यक आयुक्त मंगला मून यांनी प्रभारी म्हणून कामकाज सांभाळले. मात्र, आता नियमित समाजकल्याण अधिकारी दाखल झालेत. एकंदरीत या विभागाच्या प्रशासकीय कार्यपद्धतीमुळे सेससह दिव्यांग कल्याणाचा निधीही अखर्चित पडल्याने निधी विनियोगात झेडपीची यंत्रणा फेल ठरली आहे.

जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागात आर्थिक व प्रशासकीय बेशिस्त आहे. कुणाचा कुणावर वचक उरला नाही. प्रतिनियुक्त्यांचा बाजार वर्षानुवर्ष कायम आहे. आयुक्तांची परवानगी न घेता अनेक विभागात असे वसुलीबाज कर्मचारी नेमण्यात आले. त्यात समाजकल्याण विभागात अधिकाऱ्यांचा निकटवर्तीय म्हणून एक कर्मचारी गेल्या काही वर्षांपासून सक्रिय आहे. निवासी व दिव्यांग वसतिगृहांच्या तपासणी व देयकासंबंधीच्या * पान ४ वर

देयकांसाठी चिरीमिरीचे सुजित तंत्र



दिव्यांगांसाठी ८६ लाख ७० हजार

समाजकल्याणला ५ टक्के दिव्यांग कल्याणाचा निधी मिळतो. २०२६-२७ मध्ये ८६ लाख ७० हजार तरतूद आहे. त्यात अस्थिव्यंगांना स्वयंचलीत तीनचाकी सायकल पुरविणे, दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडास्पर्धेसाठी अनुदान, दिव्यांगांना झेरॉक्स मशीन, आटाचक्की,दिव्यांग विभागासाठी डिजिटल कक्ष निर्माण करणे, कर्णबधिर मुलांना कॉकलिया इन्प्लांट मशीन व देखभालदुरूस्तीसाठी अर्थसहाय्य, स्वयंसहाय्य गटांना स्वयंरोजगारासाठी ई-रीक्षा पुरविणे, दिव्यांग शेतकऱ्यांना अवजारे पुरवठा अशा तरतुदींचा समावेश आहे. मात्र, यातही समाजकल्याण विभागाचा परफॉर्मन्स नाही हे विशेष.

सव्वासात लाखांचा मुद्देमाल जप्त, पाच जणांवर गुन्हा दाखल

महागावात २६१ क्विंटल रेशनचा तांदूळ जप्त

लोकसूत्र प्रतिनिधी

महागाव : गोरगरिबांच्या हक्काचा रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात वळविण्याचा प्रयत्न महागाव पोलिसांनी उधळून लावला आहे. नांदेड-नांदगव्हाण मार्गावर संशयास्पदरित्या उभ्या असलेल्या ट्रकमधून तब्बल २६१ क्विंटल रेशनचा तांदूळ जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत ७ लाख २० हजार ५४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कार्यवाही पोलिस आणि महसूल विभागाच्या संयुक्त पथकाने केली आहे.

२३ ऑक्टोबर रोजी एमएच २६ एडी १७७८ क्रमांकाचा ट्रक संशयास्पद अवस्थेत आढळल्याने पोलिसांनी त्याची तपासणी केली. ट्रकमध्ये ५५० कट्ट्यांमध्ये २६१ क्विंटल तांदूळ भरलेला होता. चालक मोहम्मद खलील मोहम्मद शफी याच्याकडे वाहतुकीची कोणतीही वैध कागदपत्रे आढळली नाहीत.त्यानंतर दि. २८ ऑक्टोबर रोजी तहसीलदार, पुरवठा निरीक्षक * पान ४ वर



कापसाची चोरी

यवतमाळ : महागाव तालुक्यात येणाऱ्या डोंगरगाव येथील सय्यद जमील सय्यद हकीम यांनी आपल्या शेतातील कापूस डोंगरगाव येथील घराच्या बाथरूम मध्ये जमा करून ठेवला होता. यातील एक क्विंटल कापूस अज्ञात आरोपीने एक नोव्हेंबर ते दोन नोव्हेंबर च्या मध्यरात्री चोरून नेला या कापसाची किंमत दहा हजार रुपये एवढी असून या चोरी प्रकरणी त्यांनी पोफाळी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

देशी पिस्टलसह काडतूस जप्त
दोन लाख २२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

अग्निशस्त्रासह तिघे गुन्हे शाखेच्या जाळ्यात



लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : शहरात रक्तरंजीत घटनांचा आलेख वाढत असतानाच अग्निशस्त्राच्या खरेदीविक्रीचे प्रकारही पुढे येत आहेत. त्यातूनच गुन्हे शाखेला पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या माहितीद्वारे पथकाने ॲक्सेस मोपेडवरील तिघांना थांबवून विचारणा केली. त्यांच्याकडून देशी बनावटीच्या पिस्टलसह दोन जीवंत काडतूस व दुचाकी असा दोन लाख २२ हजारांचा मुद्देमालही जप्त केला. ही कारवाई ३ नोव्हेंबरला चौसाळा रोडवर करण्यात आली.

परसराम रामचंद्र कदम (२८) रा. सेलगाव, ता. लोहा, जि. नांदेड, विक्की प्रभाकर दिवटे (३०) रा. बोरगाव डॅम व संजय अमरसिंग आडे (३३) रा. तडकपुरा, नेर अशी ताब्यात घेतलेल्या तिघांची नावे आहेत. ३ नोव्हेंबरला गुन्हे शाखेचे पथक यवतमाळ उपविभागात गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने पेट्रोलिंगवर होते. दरम्यान पथकाला गुप्त माहिती मिळाली की, चौसाळा रोडवर एमएच २९/सीएच १७०३ या क्रमांकाची मोपेड ॲक्सेस व एमएच २१/एडब्ल्यू ५९८६ या क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या मॅस्टेरीओ वाहनाने तीन इसम येत आहेत. त्यांच्याकडे देशी बनावटीची पिस्टल असून ते आपसात अग्रीशस्त्राची खरेदीविक्री करणार आहेत. दरम्यान, पथकाने घटनास्थळ गाठून दोन्ही मोपेड वाहने ताब्यात घेत * पान ४ वर

'बीॲण्डसी'कडे एक लाख कोटींची देयके प्रलंबित, कंत्राटदारांचे अस्तित्वाचे रणशिंग, कंत्राटदारांची आर्थिक घुसमट

विकासाचा कणा खिळखिळा ; कंत्राटदार आक्रमक

केशव सवळकर

यवतमाळ : रस्ते, पूल आणि इमारतींच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासाचा पाया रचणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाची आर्थिक घडी पुरती विस्कटली आहे. वर्षाकाठी एक लाख कोटींची देयके प्रलंबित राहत असल्याचे वास्तव मांडत कंत्राटदारांनी अमरावतीतील मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयापुढे सरकारचे वैकुंठगमन झाल्याचे दाखवत तेरवी भोजन आंदोलनही केले.

बीॲण्डसीचे वार्षिक बजेट आणि प्रत्यक्षात निर्माण होणारे वित्तीय दायित्व यात कमालीची तफावत आहे. परिणामी राज्यातील लाखो कंत्राटदार आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. एकीकडे हजारो कोटींची जुनी देयके वर्षानुवर्षे अडकून पडली असताना, दुसरीकडे नवीन टेंडरचा सपाटा सुरूच आहे. निर्माण झालेल्या दुष्टचक्रामुळे कंत्राटदारांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याच तीव्र असंतोषातून अमरावतीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता कार्यालयाबाहेर कंत्राटदारांनी थेट शोक संदेश दर्शवणारे बॅनर लावून आणि अनोखे प्रतीकात्मक मृत्युभोजन आंदोलन करत शासनाचा निषेध नोंदवला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सद्यस्थितीचा सखोल अभ्यास केल्यास या गंभीर आर्थिक संकटामधील भीषणता स्पष्ट होते. विभागाचे वार्षिक बजेट अंदाजे २० हजार कोटींचे आहे. सध्याची प्रलंबित देयके अंदाजे एक लाख कोटीची * पान ४ वर

अमरावतीत 'सीई'कार्यालयापुढे तेरवी आंदोलन, नवीन टेंडरचा पाऊस अन् जुन्या बिलांचा दुष्काळ



पुढील ५ वर्षांतील दायित्वाचा वाढता आलेख

सुरुवातीचे दायित्व एक लाख कोटीचे पहिले वर्ष एक लाख १५ हजार कोटी, दुसरे वर्ष एक लाख ३० हजार कोटी, तिसरे वर्ष: एक लाख ४५ हजार कोटी, चौथे वष एक लाख ६० हजार कोटी, पाचवे वर्ष एक लाख ७५ हजार कोटी होतील असाही हिशोब अभ्यासू कंत्राटदार रमेश गिरोलकरांनी मांडला.

...तर आठ वर्ष उलटतील

१ लाख ७५ हजार कोटींच्या घरात पोहोचलेली देयके निकाली काढण्यासाठी उपलब्ध बजेटनुसार तब्बल ८ वर्षे ९ महिने लागतील. परंतु, नवीन कामांचा मारा असाच सुरू राहिला आणि जुन्या बिलांना तुटपुंजी रक्कम मिळत राहिली, तर केवळ जुनी देयके मिळण्यासाठीच कंत्राटदारांना सैद्धांतिकदृष्ट्या २० वर्षे प्रतीक्षा करावी लागण्याची दाट शक्यता असल्याचेही स्पष्ट केले.

कठोर शब्दातील आंदोलनाने खळबळ

निधी उपलब्ध नसलेल्या कामांना मंजुरी देणाऱ्या व कामे करून घेणाऱ्या प्रतिनिधी तथा अधिकाऱ्यांनी अवश्य यावे आणि जाताना पोटभर जेवण करून घरी डबा घेऊन जावे, असा टोमणाही या फलकावर मारण्यात आला होता. या अनोख्या आणि तितक्याच टोकदार आंदोलनामुळे प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

वास्तव याहून अधिक भयावह

बीॲण्डसीचे बजेट २० हजार कोटींचे आहे. प्रलंबित देयके एक लाख कोटींची आहे. दरवर्षी १५ हजार कोटींची नवी कामे आणि टेंडर काढल्यास, वार्षिक २० हजार कोटींपैकी जुन्या बिलांसाठी केवळ पाच हजार कोटी शिल्लक राहतील. पुढील पाच वर्षांत नवीन टेंडरची भर पडत गेल्यामुळे हे एकूण दायित्व थेट एक लाख ७५ हजार कोटींवर जाऊन पोहोचेल असेही कंत्राटदार गिरोलकर यांनी दै. लोकसूत्रला सांगितले.

शोक संदेश फलक लावून आंदोलन

एकीकडे बँकांचे कर्ज, कामगारांचे वेतन, साहित्याची थकबाकी आणि जीएसटीच्या फेऱ्यामुळे कंत्राटदार उद्ध्वस्त होत आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागांत आर्थिक विवंचनेतून व नैराश्यातून कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटना समोर आल्या आहेत.अमरावतीत संतापलेल्या कंत्राटदारांनी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाबाहेर ''उधारीचे काम सदा प्रसन्न, कर्जबाजारी ठेकेदार समर्थ' असा उपरोधिक मथळ्याचा फलक लावला. यात १९ ऑक्टोबर ला शासनाचे निधन दाखवून मृत्युनंतरचा विधी आंदोलनही कंत्राटदारांनी केले.

चारा टंचाई आणि उपाययोजना



महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हे प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहेत. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पुर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंदाच्या खरीप हंगामापासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे. त्यातही चाऱ्याअभावी पशुधन वाचविणे ही एक मोठी समस्या समोर उभी राहणार आहे. महाराष्ट्र राज्यात २०२६ च्या नैऋत्य मोसमी पावसामध्ये झालेली तूट, पावसाचे असमान वितरण, खरीप पिकांच्या उत्पादनात झालेली घट तसेच यावर्षीच्या रब्बी हंगामामधील संभाव्य कमी पेरणी क्षेत्र यामुळे पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच आगामी काळात पशुधनासाठी हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या संभाव्य चारा टंचाईवर वेळीच मात करण्यासाठी कृषी विभागामार्फत राज्यभरात चारा उत्पादनावर भर देण्यात येणार आहे. राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमितीस चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता ६ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयान्वये गठीत अभ्यासगटाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये चारा उत्पादन वाढविणे, कमी पाण्यात येणाऱ्या व बहुकापणी चारा पिकांना प्रोत्साहन देणे, चारा बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे, शासकीय जमिनीवर चारा लागवड करणे, चारा उत्पादनाबाबत प्रात्यक्षिके आयोजित करणे आणि उपलब्ध यंत्रसामग्रीचा वापर करणे इत्यादी उपाययोजनांची शिफारस करण्यात आली आहे. या शिफारशींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय यंत्रणा, कृषी विद्यापीठ, तालुका बीज गुणन केंद्र व संबंधित संस्थांनी समन्वयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०२० मध्ये चारा टंचाईच्या काळात कृषी विभागाने करावयाची कार्यवाही नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने अभ्यासगटाच्या कृषी विभागाशी संबंधित शिफारशींची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता कृषी विभागामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची गरज ओळखून त्यादृष्टीने शासनाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. दुष्काळजन्य परिस्थितीत चारा टंचाईवर उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत अभ्यासगटाच्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या अहवालातील कृषी विभागाशी संबंधित शिफारशी विचारात घेऊन, राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी कृषी विभागामार्फत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

चारा बियाण्यांची उपलब्धता व नियोजन

रब्बी हंगाम २०२६ मध्ये चारा बियाण्याची कमतरता भासू नये याकरीता आयुक्त (कृषी) यांनी चारा पिकांच्या लागवडीसाठी आवश्यक असलेल्या बियाण्यांची जिल्हानहाय व पिकनिहाय मागणी पशुसंवर्धन विभागातील संबंधित अधिकारी यांच्या समन्वयाने निश्चित करावी. त्यानुसार महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, एच.आय.एल., कृभको, एन.एफ.एल., आय.एफ.एफ.डी.सी., आय.सी.ए.आर., के.व्ही.के. इत्यादी यांच्या समन्वयाने बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तथापि, यासंदर्भातील केंद्र शासनाच्या सर्वसाधारण व विशिष्ट मार्गदर्शक सूचनांचे तसेच आवश्यक त्या नोंदणी, परवाना इत्यादींचे काटेकोर पालन करण्यात यावे. कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीत उत्पादन देणारी व एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणारी चारा पिके घेण्यास प्राधान्य देण्यात यावे. यासाठी स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार, सिंचनाची उपलब्धता व पीक कालावधी विचारात घेऊन योग्य चारा पिकांची शिफारस पशुसंवर्धन विभागाच्या संबंधित जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या समन्वयाने शेतकऱ्यांना करण्यात यावी.

चारा साक्षरता अभियान व प्रोत्साहन

स्थानिक परिस्थितीनुसार मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, शुगरग्रेझ व इतर योग्य चारा पिकांच्या लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे. सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे अशा क्षेत्रांमध्ये रब्बी हंगामात चारा पिकांची लागवड वाढविण्यासाठी आवश्यक बियाणे, खतांचा संतुलित वापर, पाणी व्यवस्थापन, पेरणीची योग्य वेळ, कापणी व पुनर्वाढ साठवणूक व अपव्यय कमी करणे इत्यादी बाबत कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणांनी पशुसंवर्धन विभाग, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांच्या समन्वयाने मार्गदर्शन करावे. चारा पिकांची लागवड, उत्पादन खर्च, अपेक्षित उत्पादन, कापणीचे नियोजन, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि चाऱ्याचे संवर्धन व मूल्यवर्धन याबाबत शेतकरी प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत. चारापिकांचे लागवड तंत्र, खत व्यवस्थापन व अल्प कालावधीचे गवत व हंगामी चारापिके इत्यादी चारा लागवडीच्या तांत्रिक बाबींबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी कृषी विभागाच्या नियमित विस्तार कार्यक्रमांचा प्रभावी वापर करावा.

कृषी विभागाच्या जमिनीवर चारा

कृषी विभागाच्या अधिपत्याखालील कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे व महाबीज इत्यादी कडील जमिनींचा आढावा घेऊन, जेथे शक्य आहे व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत अशा क्षेत्रांवर मका, न्यूट्रीफीड, शुगरग्रेज, ज्वारी, बाजरी यासारख्या चारा पिकांची रब्बी हंगामात प्राधान्याने लागवड करण्यात यावी. हायड्रोफोनिक, अझोला व बिनकाटेरी निवडून लागवड यासारख्या पर्यायी स्रोताद्वारे चारा उत्पादन करण्याच्या पद्धतींचा कृषी विद्यापीठाद्वारे मोहिम स्वरुपात कार्यक्रम राबविण्यात यावा. संबंधित संस्थांनी उपलब्ध जमीन, सिंचन सुविधा, लागवडीसाठी आवश्यक निविष्ठा व अपेक्षित उत्पादन यांचा विचार करून चारा लागवडीचा नियोजन आराखडा तयार करावा. कृषी विद्यापीठे व बीज गुणन केंद्रांच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक चारा लागवड प्लॉट विकसित करण्यात यावेत. या प्रक्षेत्रांचा उपयोग शेतकरी प्रशिक्षण, चारा पिकांचे प्रात्यक्षिक व तंत्रज्ञान प्रसारासाठी करण्यात यावा. ही कार्यवाही करताना संबंधित जमिनींचा मूळ उद्देश,अंमलात असलेली प्रचलित कार्यपद्धती यांचा अवलंब करावा.

चारा कापणीसाठी यंत्रसामग्री

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील कस्टम हायरींग सेंटर, कृषी औजारे बँक यांची व त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीची माहिती शेतकऱ्यांना तसेच पशुसंवर्धन विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावी. पशुसंवर्धन विभागाच्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ही माहिती व त्यांच्याकडील माहिती विचारात घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करावी. जिल्ह्यातील उपलब्ध चाऱ्याचे/चारापिके लागवडीखालील क्षेत्राचे मॅपिंग व सूक्ष्म नियोजन करण्यासाठी चारापिकांखालील क्षेत्र, पीकनिहाय पेरणी क्षेत्र व अपेक्षित उत्पादन (पीक अवशेषांसह) याबाबतची माहिती तसेच चारा उत्पादक शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्था / कंपन्या (FPO/ FPC) यांचे नेटवर्क तयार करण्यासाठी आवश्यक माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी संबंधित यंत्रणांच्या मागणीनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी. चारा उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे. आयुक्त (कृषी) यांनी आवश्यकतेनुसार त्यांच्या स्तरावर स्वतंत्रपणे सूचना निर्गमित कराव्यात. आयुक्त (कृषी), विभागीय कृषी सहसंचालक व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी वरील बाबींच्या अनुषंगाने नियमितपणे आढावा घ्यावा. शासन परिपत्रकातील कृषी विभागाच्या संबंधित बाबींच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याकरीता कृषी आयुक्त स्तरावर संचालक, विस्तार व प्रशिक्षण, विभाग स्तरावर संबंधित विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा स्तरावर संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका स्तरावर संबंधित तालुका कृषी अधिकारी हे नोडल अधिकारी राहतील. असेही शासनाने सुचित केले आहे. महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांनी या शिफारशी / सूचनांच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच उपाययोजना व अंमलबजावणी करण्याकरीता कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठे व सर्व संबंधितांना स्वतंत्रपणे सूचना निर्गमित कराव्यात व क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय ठेवून कार्यवाही करण्याबाबत निर्देशही देण्यात आले आहेत. शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. त्याचे सोबती पशुधनही तितकेच महत्वाचे आहे. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय,अमरावती

दिव्यांच्या झगमगाटात, आर्थिक विवंचनेचा अंधार!

दिवाळीचा सण आणि बाजारपेठेतील गर्दी हे समीकरण वर्षानुवर्षे ठरलेले आहे.दिवाळी जवळ आली की नवीन कपडे, फटाके,मिठाई, आकाशकंदील, घर सजावटीच्या वस्तू आणि किराणा सामानाच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलून जातात. दुकानदारांची वर्षभराची आर्थिक गणिते या सणाच्या उलाढालीवर अवलंबून असतात. मात्र यंदा बाजारपेठेत नेहमीचा उत्साह दिसत नाही. दुकाने सजली आहेत,वस्तूंची मांडणी झाली आहे, व्यापाऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने माल भरून ठेवला आहे;परंतु ग्राहकांची पावले थांबली आहेत. बाजारपेठेत वस्तूंची रेलचेल आहे,पण त्या खरेदी करण्यासाठी ग्राहकांच्या खिशात पैसा नाही. ही परिस्थिती केवळ व्यापाऱ्यांची चिंता वाढविणारी नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विदारक वास्तवाचे दर्शन घडविणारी आहे. यंदा राज्यातील अनेक भागांत पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीचे अर्थकारण कोलमडले आहे. कुठे पिके करपली,कुठे उत्पादन घटले, तर कुठे अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही.कापूस, सोयाबीनसारख्या पिकांनी शेतकऱ्यांना निराश केले आहे. त्यात आणखी गंभीर बाब म्हणजे शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी आपला माल विक्रीसाठी काढला असला, तरी समाधानकारक दराअभावी तो घरात किंवा बाजार समित्यांमध्ये पडून आहे. काहींचा माल विकला,तरी उत्पादन खर्च, कर्ज आणि घरखर्च वजा जाता हातात फारसे काही उरत नाही.म्हणजे शेतकऱ्याच्या घरात माल आहे; पण खिशात पैसा नाही.ही विसंगती ग्रामीण जीवनातील आर्थिक कोंडी स्पष्ट करणारी आहे.

शेतकऱ्यांच्या या आर्थिक विवंचनेचा परिणाम शेतमजुरांच्या जगण्यावरही झाला आहे. शेतीची कामे कमी झाल्याने मजुरीचे दिवस घटले आहेत. रोज काम करून रोजचा संसार चालविणाऱ्या मजुरांच्या हाताला काम नाही आणि हातात पैसा नाही. अनेक रोजमजुर दिवाळीपुर्वी पुणे, मुंबई, सुरत सारख्या महानगारात रोजगारा अभावी स्थलांतरीत झाली आहे. रोजगार आणि आर्थिक स्थैर्य नसल्यामुळे दिवाळीसाठी मुलांना नवीन कपडे घेणे, फटाके आणणे किंवा घर सजविण्यासाठी आर्थिक चणचण भासू लागली आहे.अनेक कुटुंबे सण साजरा करण्यासाठी आवश्यक वस्तूंचीच खरेदी करीत आहेत. काहींनी तर यंदा नवीन कपड्यांची खरेदीही पुढे ढकलली आहे. हा केवळ काटकसरीचा निर्णय नाही,तर आर्थिक अगतिकतेतून निर्माण झालेली परिस्थिती आहे. ग्राहकांची हीच अगतिकता आता व्यापाऱ्यांच्या चिंतेचे कारण बनली आहे. दिवाळीच्या हंगामासाठी व्यापाऱ्यांनी भांडवल गुंतवून कपडे,फटाके, किराणा आणि सजावटीच्या वस्तूंचा साठा केला आहे. काहींनी उधारीवर तर काहींनी कर्ज काढून माल खरेदी केला आहे. मात्र अपेक्षित विक्री होत नसल्याने माल दुकानातच पडून आहे.दुकानभाडे, वीजबिले, कामगारांचे वेतन आणि कर्जाचे हप्ते यांचा भार मात्र कमी झालेला नाही. विशेषतःलहान दुकानदारांसाठी ही परिस्थिती अधिक कठीण आहे. ग्राहकांच्या प्रतीक्षेत दुकान उघडे ठेवायचे, पण विक्री न झाल्याने खर्च कसा भागवायचा, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.कारण शेतकरी, शेतमजूर आणि व्यापारी हे अर्थव्यवस्थेचे स्वतंत्र घटक नसून एकमेकांशी जोडलेले आहेत. शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही,त्यामुळे त्याच्या हातात पैसा नाही. त्याच्याकडे पैसा नाही,म्हणून मजुराला काम मिळत नाही. मजुराकडे क्रयशक्ती नाही, म्हणून व्यापाऱ्याची विक्री घटते.ही आर्थिक साखळी विस्कळीत झाली की तिचा परिणाम संपूर्ण बाजारपेठेवर होतो.त्यामुळे बाजारपेठेतील मंदीचे खापर केवळ ग्राहकांच्या काटकसरीवर फोडून चालणार नाही. शासनाने शेतमालाला योग्य भाव,नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वेळेवर मदत, पीकविम्याची भरपाई आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.कारण शेतकऱ्यांच्या हातात पैसा आल्याशिवाय बाजारपेठेला चैतन्य येणार नाही.दिवाळीच्या बाजारपेठेत दिव्यांची रोषणाई आहे; पण अनेक घरांत आर्थिक अंधार आहे. व्यापाऱ्यांच्या दुकानांत माल आहे;पण ग्राहकांच्या हातात खरेदीची ताकद नाही. शेतकऱ्यांचा माल विकला जात नाही,मजुरांच्या हाताला काम मिळत नाही आणि व्यापाऱ्यांचा माल खपत नाही. अशा वेळी प्रश्न केवळ दिवाळीच्या खरेदीचा राहत नाही, तर सामान्य माणसाच्या आर्थिक सुरक्षिततेचा बनतो. बाजारपेठेतील खरेदीदारांची पाठ फिरणे हे विक्रेत्यांच्या चिंतेचे कारण असले, तरी त्या चिंतेच्या मुळाशी शेतकऱ्याच्या रिकाम्या खिशाचे वास्तव दडलेले आहे.दिवाळीचा खरा प्रकाश बाजारपेठेतील रोषणाईत नव्हे, तर सामान्य माणसाच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणि समाधान निर्माण होण्यात आहे.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, मो:९१३०८३५४५८

इस्रोच्या 'जीएसएलव्ही-एफ१८' मोहिमेचे यश



भारताच्या अंतराळ तंत्रज्ञानाच्या प्रवासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने ३० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११ वाजून ५१ मिनिटांनी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या दुसऱ्या प्रक्षेपण तळावरून जीएसएलव्ही-एफ१८ या प्रक्षेपण यानाद्वारे एनव्हीएस-०३ या नव्या पिढीतील दिशादर्शक उपग्रहाचे प्रक्षेपण केले. भारताच्या स्वदेशी दिशादर्शक प्रणालीला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची मानली जात आहे. या प्रणालीला 'नाविक' म्हणजेच छरींळसरींळेपुळींह खपवळरप उेपींशश्रश्ररींळेप असे म्हटले जाते. या मोहिमेचे महत्त्व केवळ एका उपग्रहाच्या प्रक्षेपणापुरते मर्यादित नाही. आधुनिक काळात उपग्रहाधारित स्थाननिश्चिती, दिशादर्शन आणि अचूक कालमापन या सेवा नागरी जीवन, अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यावश्यक बनल्या आहेत. वाहतूक व्यवस्थापन, सागरी वाहतूक, आपत्ती व्यवस्थापन, दूरसंचार, वैज्ञानिक संशोधन, शेती, मत्स्यव्यवसाय, मालवाहतूक आणि संरक्षण अशा अनेक क्षेत्रांत या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. त्यामुळे स्वतंत्र, विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण दिशादर्शक प्रणाली विकसित करणे हे भारताच्या वैज्ञानिक प्रगतीबरोबरच तांत्रिक स्वावलंबनासाठीही महत्त्वाचे आहे. जीएसएलव्ही-एफ१८ हे भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यान अर्थात जीएसएलव्ही मालिकेतील विसावे उड्डाण आहे. भूस्थिर संक्रमण कक्षेत उपग्रह प्रस्थापित करण्यासाठी भारत वापरत असलेल्या प्रमुख प्रक्षेपण यानांपैकी जीएसएलव्ही एक आहे. इस्रोने विकसित केलेल्या या यानाने भारताच्या दळणवळण, हवामान निरीक्षण आणि दिशादर्शक उपग्रह कार्यक्रमांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या मोहिमेत एनव्हीएस-०३ उपग्रहाला प्रथम भूस्थिर संक्रमण कक्षेत पोहोचविण्याचे नियोजन आहे. त्यानंतर उपग्रहावरील प्रणोदन प्रणालीच्या साहाय्याने त्याला अपेक्षित कार्यकारी कक्षेत नेण्यासाठी आवश्यक कक्षीय बदल केले जातील. भूस्थिर संक्रमण कक्षा ही लंबवर्तुळाकार मधली कक्षा असते. प्रक्षेपण यान उपग्रहाला आवश्यक प्रारंभिक वेग आणि दिशा देते. त्यानंतर उपग्रहाची स्वतःची प्रणोदन प्रणाली त्याला पुढील कार्यकारी कक्षेत नेण्यासाठी कार्य करते. त्यामुळे उपग्रहाचे प्रक्षेपण हा मोहिमेचा केवळ पहिला टप्पा असतो. त्यानंतर कक्षीय बदल, विविध यंत्रणांची तपासणी, संकेतांची पडताळणी, तांत्रिक चाचण्या आणि जमिनीवरील नियंत्रण प्रणालीशी एकत्रीकरण हे टप्पे पूर्ण होणे आवश्यक असते. या सर्व प्रक्रिया यशस्वी झाल्यानंतरच उपग्रहाकडून नियमित सेवा मिळू शकतात. एनव्हीएस-०३ हा भारताच्या दुसऱ्या पिढीतील दिशादर्शक उपग्रह मालिकेतील तिसरा उपग्रह आहे. भारतीय प्रादेशिक दिशादर्शक उपग्रह प्रणाली, जी आता 'नाविक' म्हणून ओळखली जाते, तिच्या सेवांमध्ये सातत्य राखणे आणि तांत्रिक क्षमता वाढविणे हा या मालिकेचा प्रमुख उद्देश आहे. इस्रोच्या माहितीनुसार, या उपग्रहामध्ये स्वदेशी विकसित अणुघड्याळासह परदेशातून प्राप्त केलेली अणुघड्याळेही असतील. सध्या वापरात असलेल्या एल५ आणि एस-बँड संकेतांबरोबर एल१ या दिशादर्शक वारंवारता पट्ट्यातील संकेतांचाही समावेश करण्यात आला आहे. या उपग्रहाच्या नियोजित सेवा क्षेत्रात भारताचा भूभाग आणि भारताच्या सीमांपलीकडे सुमारे १,५०० किलोमीटरपर्यंतचा प्रदेश समाविष्ट आहे.

दिशादर्शक उपग्रहातील सर्वांत महत्त्वाच्या घटकांपैकी एक म्हणजे अचूक कालमापन करणारे घड्याळ. उपग्रह दिशादर्शक प्रणालीमध्ये उपग्रहाकडून पृथ्वीवरील ग्राहक उपकरणापर्यंत रेडिओ संकेत पोहोचण्यास लागणारा वेळ मोजून अंतराचा अंदाज घेतला जातो. या गणनेवरून उपकरणाचे स्थान निश्चित केले जाते. रेडिओ संकेत प्रकाशाच्या वेगाने, म्हणजेच निर्वातात सुमारे तीन लाख किलोमीटर प्रतिसेकंद वेगाने प्रवास करतात. त्यामुळे कालमापनातील अतिशय सूक्ष्म चूकसुद्धा स्थाननिश्चितीत मोठी त्रुटी निर्माण करू शकते. उदाहरणार्थ, संकेताच्या प्रवासाच्या वेळेत एका मायक्रोसेकंदाची चूक झाली, तर अंतराच्या गणनेत सुमारे ३०० मीटरची तफावत निर्माण होऊ शकते. म्हणूनच दिशादर्शक उपग्रहांमध्ये अत्यंत स्थिर आणि अचूक अणुघड्याळांची आवश्यकता असते. मात्र उपग्रहाची एकूण कामगिरी केवळ अणुघड्याळावर अवलंबून नसते. संकेत निर्मिती, उपग्रहाची कक्षा, वातावरणाचा परिणाम, जमिनीवरील नियंत्रण यंत्रणा, ग्राहक उपकरणाची क्षमता आणि त्रुटी-सुधारणा तंत्र यांचाही त्यावर परिणाम होतो. अनेक उपग्रहांकडून मिळणाऱ्या संकेतांचा वापर करून अक्षांश, रेखांश, उंची आणि उपकरणाच्या अंतर्गत घड्याळातील त्रुटी यांचा एकत्रित अंदाज घेतला जातो. सामान्यतः अचूक त्रिमितीय स्थाननिश्चितीसाठी किमान चार उपग्रहांचे संकेत आवश्यक असतात. 'नाविक' ही भारताची स्वतंत्र प्रादेशिक उपग्रह दिशादर्शक प्रणाली आहे. अमेरिकेच्या जीपीएसप्रमाणे ती स्थाननिश्चिती, दिशादर्शन आणि अचूक कालमापनाची सेवा पुरवते. मात्र संपूर्ण जगभर सेवा देणाऱ्या काही प्रणालींपेक्षा नाविकचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने भारत आणि भारतीय भूभागाच्या सीमांपलीकडे सुमारे १,५०० किलोमीटरपर्यंतचा परिसर असे आहे. नाविकद्वारे दोन प्रकारच्या सेवा पुरविल्या जातात. पहिली मानक स्थाननिश्चिती सेवा, जी सर्वसामान्य नागरी वापरासाठी असते; आणि दुसरी प्रतिबंधित सेवा, जी अधिकृत वापरकर्त्यांसाठी नियंत्रित स्वरूपात उपलब्ध असते. एनव्हीएस-०३ मधील एल१ वारंवारता पट्ट्याचा समावेश विशेष महत्त्वाचा आहे. एल१ हा नागरी दिशादर्शक उपकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरला जाणारा पट्टा आहे. त्यामुळे नाविकच्या नव्या पिढीतील उपग्रहांमध्ये त्याचा समावेश केल्याने प्रणालीची उपयुक्तता वाढू शकते. रस्त्यांवरील दिशादर्शन, वाहनांच्या ताफ्याचे व्यवस्थापन, स्थानाधारित मोबाइल सेवा आणि इतर नागरी तंत्रज्ञानासाठी त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. मात्र एल१ संकेत उपलब्ध झाले म्हणून प्रत्येक विद्यमान स्मार्टफोन किंवा दिशादर्शक उपकरण नाविक प्रणालीशी आपोआप सुसंगत होईल, असे नाही. त्यासाठी उपकरणाच्या हार्डवेअरमध्ये आवश्यक क्षमता, तसेच फर्मवेअर आणि सॉफ्टवेअरचे तांत्रिक समर्थन आवश्यक असते.

अनेक वारंवारता पट्ट्यांतील संकेतांचा एकत्रित वापर केल्यास वातावरणामुळे निर्माण होणाऱ्या काही मापन त्रुटी कमी करण्यास मदत होऊ शकते. विशेषतः आयनोस्फिअरमधून प्रवास करताना रेडिओ संकेतांच्या वेगावर होणारा परिणाम वेगवेगळ्या वारंवारतांच्या मापनांच्या आधारे दुरुस्त करता येतो. तरीही प्रत्यक्ष स्थाननिश्चितीची अचूकता केवळ वारंवारता पट्ट्यांवर अवलंबून नसते. उपग्रहांची आकाशातील स्थिती, वातावरणीय परिस्थिती, संकेतांची गुणवत्ता, ग्राहक उपकरणाची क्षमता आणि इतर तांत्रिक घटकही तेवढेच महत्त्वाचे असतात. उपग्रह दिशादर्शक प्रणालीमध्ये सातत्यपूर्ण सेवा उपलब्ध ठेवण्यासाठी कार्यरत उपग्रहांची संख्या आणि त्यांची कार्यक्षमता महत्त्वाची असते. प्रत्येक उपग्रहाचे आयुष्य मर्यादित असते. त्यामुळे जुन्या उपग्रहांची जागा घेण्यासाठी नवे उपग्रह प्रक्षेपित करणे आणि संपूर्ण प्रणालीची कार्यक्षमता टिकवून ठेवणे आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर एनव्हीएस-०३ मोहिमेचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. जानेवारी २०२५ मध्ये प्रक्षेपित करण्यात आलेल्या एनव्हीएस-०२ उपग्रहाला प्रारंभिक कक्षेत यशस्वीपणे स्थापित करण्यात आले होते. मात्र त्यानंतर अपेक्षित कार्यकारी कक्षेत नेण्यासाठी आवश्यक असलेल्या कक्षीय बदलांच्या प्रक्रियेत तांत्रिक अडचण निर्माण झाली. ऑक्सिडायझरच्या प्रवाहाशी संबंधित पायरो व्हॉल्व्हपर्यंत आवश्यक विद्युत संकेत न पोहोचल्यामुळे उपग्रहाच्या इंजिनला अपेक्षित कार्य करता आले नाही. परिणामी, उपग्रहाला नियोजित कार्यकारी कक्षेत नेणे शक्य झाले नाही. या अनुभवातून प्रक्षेपणानंतरच्या प्रक्रियांची गुंतागुंत अधोरेखित झाली. प्राथमिक कक्षा गाठणे आणि कार्यकारी कक्षेत स्थिर होणे या दोन स्वतंत्र व महत्त्वाच्या प्रक्रिया आहेत.

आज उपग्रह दिशादर्शक प्रणाली ही केवळ नागरी सोयीची बाब राहिलेली नाही. ती देशाच्या आर्थिक, तांत्रिक आणि सामरिक क्षमतेचा महत्त्वपूर्ण भाग बनली आहे. संरक्षण क्षेत्रात अचूक स्थाननिश्चिती आणि कालमापनाचा उपयोग लष्करी वाहनांचे दिशादर्शन, सागरी मोहिमांचे नियोजन, विमानांचे मार्गनियोजन आणि विविध यंत्रणांमधील समन्वयासाठी होतो. आपत्ती व्यवस्थापनात भूकंप, पूर किंवा चक्रीवादळ यांसारख्या संकटांनंतर बचाव पथकांना योग्य ठिकाणी पोहोचण्यासाठी दिशादर्शक प्रणालींची मदत मिळते. भारताने स्वतःची दिशादर्शक प्रणाली विकसित केल्यामुळे महत्त्वपूर्ण सेवांसाठी केवळ परदेशी प्रणालींवर अवलंबून राहण्याची गरज कमी होते. मात्र नाविकची उपलब्धता आणि कार्यक्षमता टिकवण्यासाठी पुरेशा संख्येने कार्यरत उपग्रह, विश्वासार्ह जमिनीवरील नियंत्रण यंत्रणा आणि नियमित तांत्रिक देखभाल आवश्यक आहे. एनव्हीएस-०३ हा नाविकच्या दुसऱ्या पिढीतील नियोजित उपग्रहांपैकी महत्त्वाचा टप्पा आहे. एनव्हीएस-०१ आणि एनव्हीएस-०२ यांच्यानंतर एनव्हीएस-०३, एनव्हीएस-०४ आणि एनव्हीएस-०५ यांच्या माध्यमातून प्रणालीची क्षमता वाढविण्याचे नियोजन आहे. जीएसएलव्ही-एफ१८/एनव्हीएस-०३ ही मोहीम भारताच्या स्वदेशी उपग्रह दिशादर्शक तंत्रज्ञानाच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरू शकते. स्वदेशी अणुघड्याळ, एल१ संकेत, प्रगत इलेक्ट्रॉनिक्स, कक्षीय नियंत्रण आणि जमिनीवरील तांत्रिक पायाभूत सुविधांचा समन्वय भारताच्या अंतराळ स्वावलंबनाला नवी दिशा देऊ शकतो. या मोहिमेचे अंतिम यश उपग्रहाचे कार्यकारी कक्षेत स्थिरीकरण, त्यानंतरच्या चाचण्या आणि सेवांच्या प्रत्यक्ष गुणवत्तेवर अवलंबून असेल. तरीही ही मोहीम वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक स्वावलंबन आणि राष्ट्रीय सामरिक स्वायत्ततेच्या दिशेने भारताने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पणती जपून ठेवा.. अंधार फार झाला!

दिवाळी आली की घराघरांत दिव्यांची आरास सजते.अंगणात उमटते रांगोळी नक्षीदार, टिबक्या-टीब क्यांची,दारात आकाशकंदील झळकतो, झेंडुच्या पिवळी केसरी फुलांच्या माळा,हिरवे आब्यांच्या पानां नी सजलेली तोरणे आणि पणत्यांच्या मंद प्रकाशाने घर उजळून निघते. मात्र या सगळ्या झगमगाटात एक प्रश्न मनाला स्पर्श करून जातो, तो म्हणजे आपण दिव्यांची रोषणाई करतो ;पण त्या प्रकाशामागचा संस्कार जपतो आहोत का ? म्हणूनच म्हणावेसे वाटते, 'पणती जपून ठेवा, अंधार फार झाला!' 'पणती' हा केवळ मातीचा दिवा नाही,तर आपल्या संस्कृतीचा, साधेपणाचा आणि आशावादाचा वारसा आहे. कुंभाराच्या हाताने आकार घेतलेली ही पणती जेव्हा तेल आणि वात घेऊन पेटते,तेव्हा ती केवळ अंधार दूर करीत नाही,तर माणसाच्या मनात आशेचा किरण निर्माण करते. तिच्या प्रकाशात आपले बालपण, आजीच्या गोष्टी, अंगणातील रांगोळी,अभ्यंग स्नानानंतरचा उटण्याचा सुगंध आणि घरभर दरवळणारा फराळाचा सुगंध सामावलेला आहे.आजच्या काळात दिवाळीचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे.एके काळी दिवाळी म्हणजे आनंदाची देवाणघेवाण, नात्यांची घट्ट वीण करणारा आणि दुःख विसरून एकमेकांच्या सुखात सहभागी होण्याचा सण होता. शेजारच्या घरात फराळ पोहोचविण्या पासून ते गरिबांच्या घरात किंवा दिवा लावण्यापर्यंत, प्रत्येक कृतीत माणुसकीचा सुगंध असायचा. मात्र, आज दिवाळीचे रूपडे पालटताना दिसते. प्रतिष्ठेचे दर्शन, फोटोजब, रिल्स, सोशल मीडियांवरील शुभेच्छांच्या गर्दीत प्रत्यक्ष माणसाशी असलेला संवाद हरवत चालला आहे.मातीच्या पणत्यांची जागा रंगीबेरंगी विद्युत दिव्यांनी घेतली आहे. आकर्षक सजावट, महागड्या रोषणाईचे साहित्य आणि दिखाऊपणाची स्पर्धा वाढली आहे. आकर्षक रोषणाईच्या या झगमगाटात पणतीचा साधा, सात्त्विक प्रकाश मात्र कुठेतरी हरवत चालला आहे. पणती जपण्याचा अर्थ केवळ श

जन्ममृत्यू नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकतेला प्राधान्य

मुख्याधिकारी शुभम क्यातमवार



यवतमाळ : जन्म आणि मृत्यू नोंदणी प्रक्रियेमध्ये पूर्णपणे पारदर्शकता तसेच अचूकता राखण्यासाठी आता जिल्हा पातळीवर ग्रामपंचायत तसेच नगरपरिषदांमधील नोंदीच्या मूळ कागदपत्राची काटेकोर पडताळणी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये बोगस चुकीच्या आणि दुबार नोंदणी तपासण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांनी दिली. अनेकदा घरी झालेली प्रसुती दाखवून नोंदणी घेतल्या जाते यासाठी कायद्याचा वापरही केला जातो. घरी प्रसुती झाल्याची नोंद असलेल्या प्रत्येक जन्म नोंदीची सखोल फेर तपासणी आता केल्या जाणार आहे. आवश्यकतेनुसार आरोग्य आणि अंगणवाडी विभागाकडील नोंदीची देखील कसून पडताळणी केली जात असल्याने तूर्तास आपले सरकार सेवा केंद्रातून ग्रामस्थांना दाखले मिळणे बंद झाले आहे. जन्म किंवा मृत्यूची घटना ज्या ठिकाणी घडते त्याच ठिकाणी ती नोंदवणे अपेक्षित आहे. ऑनलाइन प्रणालीमध्ये कोणतीही चुकीची अपूर्ण बोगस किंवा दुबार नोंद आढळल्यास फेर तपासणी करून ती दुरुस्त केली जाते अथवा ती नोंद तात्काळ रद्द करण्याची कारवाई केली जाते. तालुका निहाय विशेष तपासणी चे वेळापत्रक कामकाज अधिक नियोजनबद्ध व्हावे यासाठी यवतमाळ जिल्ह्यात तालुका निहाय, तसेच यवतमाळ नगरपरिषद अंतर्गत विशेष तपासणीचे दिवस निश्चित करण्यात आले आहेत. असेही त्यांनी स्पष्टकेले ?.

बांधकाम कामगारांना ५ हजार दिवाळी बोनस द्या!

सामाजिक कार्यकर्त्यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

यवतमाळ : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत व पात्र बांधकाम कामगारांना दिवाळी सणानिमित्त प्रत्येकी ५ हजार रुपये सानुग्रह आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

अरुण राऊत, जयानंद उबाळे, राजरत्न लोखंडे, विजय बाबर , गजानन तोडक यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे. बांधकाम कामगार हे समाजातील महत्त्वाचे घटक असून, ते इमारतींचे बांधकाम, गवंडी काम, सेंट्रिंग, प्लास्टर, फरशी बसविणे, रंगकाम तसेच इतर बांधकामविषयक कामे करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, सध्याच्या महागाईच्या काळात नियमित रोजगाराअभावी कामगारांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शासनानेया कामगारांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. पुसद शहर व संपूर्ण तालुक्यातील पात्र आणि नोंदणीकृत बांधकाम कामगारांना प्रत्येकी ५ हजार रुपये आर्थिक मदत मंजूर करून ती थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करावी, यासाठी शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच पात्र लाभार्थ्यांची पडताळणी करून संबंधित विभागांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशी मागणीही केली आहे.

अनिल गावंडे महाराष्ट्र आयडॉल



घाटंजी : पुण्यातील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने सन २०२६-२७ या वर्षासाठी जाहीर केलेल्या 'महाराष्ट्र आयडॉल शिक्षक' पुरस्कारासाठी घाटंजी तालुक्यातील येरंडगाव येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गावंडे यांची निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय निवडीमुळे संपूर्ण घाटंजी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विविध शैक्षणिक उपक्रम राबवून तालुक्यात विशेष ओळख निर्माण केल्यानंतर आता त्यांनी आपल्या कार्याचा ठसा राज्यस्तरावर उमटवला आहे. सामाजिक, जैविक, खगोलशास्त्रीय, वैज्ञानिक आणि नैसर्गिक अशा विविध क्षेत्रांतील उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजविण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते नेहमीच नवनवीन उपक्रम राबवत असतात. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र आयडॉल शिक्षक पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जुन्या भांडणावरून काठीने मारहाण

यवतमाळ : गावातील दोन कुटुंबांमध्ये किरकोळ कारणावरून ३१ ऑक्टोबर पूर्वी वाद झाला होता, या वादातूनच पुन्हा दोन्ही परिवारामध्ये शाब्दिक वाद निर्माण होऊन काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याची घटना नेर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिरसगाव येथे ३१ ऑक्टोबरला साडेचार वाजता घडली.

नेर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या शिरसगाव येथील मनोज कोंडबाजी परकाडे वय ४० आणि गोपाल दादाराव पापळकर वय २२ या दोघांचे काही दिवसांपूर्वी भांडण झाले होते. हे दोघेही सिरसगाव बस स्टँडवर मुंगसाजी पान सेंटर या ठिकाणी पान खाण्यासाठी आले. त्या ठिकाणी पुन्हा जुन्या कारणावरूनच वाद झाला. यात गोपाल दादाराव पापळकर यांनी मनोज परकाडे याला लाकडी काठीने डोक्याच्या मागे व छातीच्या उजव्या बाजूला मारहाण करून जखमी केले. तसेच शिवीगाळ करून जिवानिशी मारण्याची धमकी दिली. या घटना प्रकरणी फिर्यादी मनोज परकाडे यांनी तक्रार दिल्यावर पोलिसांनी आरोपी गोपाल पापळकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

शिवसेनेच्या वचनपूर्तीच्या दाव्यानंतरही निराशा, मदत न मिळाल्याने बळीराजाची खंत

पाच हजारांच्या अग्रीम मदतीची प्रतीक्षाच!

■ लोकसूत्र प्रतिनिधी

पुसद : आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार अग्रीम मदतीचे आश्वासन दिले होते. मात्र, दिवाळी तोंडावर येऊनही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा झाली नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. दुसरीकडे शिवसेनेकडूनही मदत जमा होण्यास आरंभ झाल्याचा दावा करीत महायुती सरकारची वचनपूर्ती झाल्याचे सांगितले गेले. प्रत्यक्षात मदतीची प्रतीक्षा कायम असल्याने संताप व्यक्त होत आहे.

यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला पावसाने ओढ दिली, तर काही भागांत अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान केले. पावसातील दीर्घखंडामुळे सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला. लागवड, बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीवर केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता धूसर झाली आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे हातात आलेले पीक हिरावले गेल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. अशा परिस्थितीत दिवाळीचा सण साजरा करणेही अनेक शेतकरी कुटुंबांसाठी कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पाच हजारांची अग्रीम मदत देण्याचे आश्वासन दिले होते. दिवाळीपूर्वी ही रक्कम खात्यात जमा होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, अद्याप अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा झालेली नसल्याने शेतकऱ्यांकडून खंत व्यक्त केली जात आहे.

घोषणा अन् प्रसिद्धीचाच भडीमार

मदतीची घोषणा झाली, प्रसिद्धीही झाली; मात्र प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी कायम आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा होण्यास सुरुवात झाल्याचा दावा शिवसेनेकडून केला जात असला, तरी सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत ही मदत पोहोचलेली नाही. त्यामुळे जाहीर केलेली रक्कम प्रत्यक्षात खात्यात जमा होणार कधी, याची प्रतीक्षा शेतकऱ्यांना लागली आहे.

नुकसानीची भरपाई कधी ?

नुकसानीच्या प्रमाणात भरपाई मिळणार का, कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी ठोस निर्णय होणार का, असे प्रश्नही उपस्थित होत आहेत. शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याऐवजी त्यांच्या डोळ्यांत पाणी आणणारी परिस्थिती निर्माण झाली असल्याची भावना व्यक्त होत आहे. पाच हजार रुपयांची मदत ही आधीच संकटातील शेतकऱ्यांसाठी पुरेशी नसली, तरी ती वेळेत मिळणे अपेक्षित होते. नुकसानीची भरपाई कधी, असा सवाल आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना महसूलची दिवाळी भेट!

■ शंकर जोगी

राळेगाव : दिवाळीचा सण प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद, उत्साह आणि नवचैतन्य घेऊन येतो. मात्र, शेतकरी आत्महत्येमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांच्या चेहऱ्यावरही दिवाळीच्या निमित्ताने आनंद फुलावा, या ~~सामाजिक भावनेतून महसूल~~ विभागाने स्तुत्य उपक्रम राबविला. आठ कुटुंबांना अन्नधान्याची कीट वाटप केली.

यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून, राळेगावचे एसडीओ सुधीर पाटील यांच्या निर्देशानुसार आणि तहसीलदार अमित भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली राजस्व मंडळ किन्ही जवादे अंतर्गत येणाऱ्या आठ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शासनाच्या वतीने दिवाळी भेट म्हणून अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. मंगळवार, ३ नोव्हेंबर रोजी किन्ही जवादे महसूल मंडळातील विहीरगाव, देहेगाव, सावित्री, मंगी, आष्टोणा, बोरी ईचोड आणि वडगाव येथील एकूण आठ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील सदस्यांना अन्नधान्य किट वितरित केली. या उपक्रमामुळे आर्थिक व कौटुंबिक संकटाचा सामना करणाऱ्या कुटुंबांना दिवाळीच्या सणात आधार मिळाला. या उपक्रमात महसूल मंडळ अधिकारी एम. डी. सानप, ग्राम महसूल अधिकारी राहुल निशाने, विकास मडावी, प्रांजू खोंडे, सौरभ चांदेकर, नसीम शेख व निळोबा मातकर तसेच महसूल सेवक उमेश चांदेकर, रुपेश पेचे, वंदना धनरे व रवींद्र ठाकरे यांनी सक्रिय सहभाग घेतला. या सामाजिक उपक्रमासाठी देहेगाव येथील ग्रामस्थ भारत काळे, सुधीरकुमार पासवान व प्रवीण लोंढे यांनी मोलाचे सहकार्य केले. संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या पाठीशी महसूल विभागाने माणुसकीच्या भावनेतून उभे राहत दिवाळीच्या सणात दिलेला हा मदतीचा हात निश्चितच कौतुकास्पद ठरत आहे.

आठ कुटुंबांना अन्नधान्य किटचे वाटप



घाटंजी तालुक्यात जनतेचा उत्साह वाढविला

मिशन जलामृत अजेंड्यावर

'वनराई' बंधाऱ्यासाठी ॲडिशनल सीईओ ऑनफिल्ड



■ लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्हा परिषदेचे सुसंवादी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी आज मंगळवारी वनराई बंधाऱ्याच्या उभारणीसाठी घाटंजी तालुक्यात दौरा केला. दुष्काळात या बंधाऱ्यांमुळे भुजल पातळीत वाढ व्हावी या दृष्टीनेही काही प्रबोधन त्यांनी केले. त्यांच्या या ऑनफिल्ड दौऱ्यामुळे घाटंजी तालुक्यातील मिशन जलामृतला बळ मिळाले.

जिल्हा परिषद प्रशासनातील लोकाभिमुख अधिकारी म्हणून ॲडिशनल सीईओ संतोष धोत्रे यांना ओळखले जाते. प्रत्येक काम नीटनेटके करण्यावर त्यांचा भर असतो. प्रामुख्याने जिल्हाभरात त्यांनी प्रभारी सीईओ असताना अनेक कामांचा वेग वाढविला होता. दरम्यान आता दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद मिशन जलामृत राबवित आहे. आज मंगळवारी धोत्रे यांनी घाटंजी तालुक्यातील पारवा येथे ग्रामस्थांनी बांधलेल्या वनराई बंधाऱ्यांची पाहणी केली. त्याचबरोबर ग्रामपंचायत मुरली येथे जिल्हा परिषद शाळेच्या चिमुकल्यांसह जेष्ठ नागरिकांनी प्रत्यक्ष लोकसहभाग व श्रमदानातून बांधलेल्या वनराई बंधाऱ्यांची पाहणी केली. यावेळी पाणी अडवा, पाणी जिरवा हा संदेश देताना त्यांनी पर्यावरणाच्या संतुलानावरही भाष्य केले.

जड वाहनाने वाहतूक व्यवस्था कोलमडली

■ लोकसूत्र प्रतिनिधी

कळंब : राळेगाव, नागपूर येथून जिल्ह्याच्या ठिकाणी ये-जा करणाऱ्या जड वाहनांमुळे कळंब शहराच्या मध्यवर्ती वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. कोट्यवधी खर्चून बांधलेल्या बायपासचा वापर न करता शहराच्या मध्य भागातून ट्रक, टिप्पर, कंटेनर यांच्या वाहतुकीमुळे शहरातील नागरिकांची घुसमट वाढली आहे.

कोट्यवधी खर्चून सरकारचा महत्वकांक्षी नागपूर-तुळजापूर रस्ता बनवला. या रस्त्यामुळे वाहतुकीला चालना मिळाली. मात्र शहराच्या परिसरात या रस्त्यामुळे अपघातात प्रचंड वाढ झाली. त्याच दरम्यान

नागपूर, राळेगाव, यवतमाळ येजा करणाऱ्या जड वाहतुकीसाठी शहराच्या बाहेरून बायपास झाला. मात्र संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. संपूर्ण जड वाहतूक ही शहराच्या मध्य भागातून जाते, त्यामुळे प्रचंड जड वाहतुकीची गर्दी होत असुन, वाहतूक खोळंबळी आहे. त्या कारणाने शहरातील येजा करणाऱ्या नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रसंगी मोठी दुर्घटना होण्याची भीती या जड वाहतुकीमुळे निर्माण झाली आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस विभागाने संयुक्त उपाययोजना करून जड वाहतूक बायपासने वळंवावी, अशी मागणी शहरातील नागरिकांनी केली आहे.

कळंबमध्ये वाहन अधिनियमाचे उल्लंघन



जुन्या पेन्शनसाठी काळ्या फिती लावून आंदोलन



■ लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : शासनाने ३१ ऑक्टोबर २००५ रोजी शासकीय सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांसह शिक्षकांना हक्काची जुनी पेन्शन योजना रद्द केली. नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू केली होती. हा काळा दिवस म्हणून राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसह शिक्षकांनी घटनेच्या निषेधार्थ २ नोव्हेंबर २०२६ ला काळ्या किती लावून निषेध व्यक्त केला.

शासनाने कर्मचाऱ्यांच्या हितासह न्याय व अधिकाराचा विचार केला नाही. संविधानासह एमईपीएस कायद्यातील तरतुदी लक्षात न घेता शासनाने अनेक चुकीचे निर्णय घेतले. या सगळ्यांचा फटका शिक्षक कर्मचाऱ्यांना बसला. दरम्यान या विरोधात कर्मचाऱ्यांनी काळ्या फीती लावून निषेध व्यक्त केला. शासनाने यामध्ये अनेक चुकीच्या पद्धतीने अर्थ लावून शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम केले आहे. शासनाने हे प्रकार बंद करून शिक्षकांना न्याय द्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य पेन्शन बचाव कृती समितीचे प्रमुख ,जुनी पेन्शन आंदोलनाचे संस्थापक संजय येवतकर यांनी केले आहे.

गृह विभागासह पोलीस यंत्रणा अनभिज्ञ, प्रशासनाने दखल घेण्याची गरज

बाभूळगावात विनापरवाना फटाक्यांची होलसेल विक्री!

■ दानिश शेख

बाभुळगाव : हिंदु संस्कृतीचा सर्वात मोठा सण दिवाळीची लगबग वाढली आहे. सद्यस्थितीत दुष्काळाची परिस्थीती असली तरी, सणवार साजरे करण्याची परंपरा जोपासण्यात नागरिक व्यस्त आहेत. अश्यावेळी निव्वळ पैसा कमावण्याच्या हव्यासापोटी दिवाळी सणासाठी लागणा-या फटाक्यांची विनारपरवाना विक्री करणा-यांनी आपली दुकाने थाटली आहेत.

चिल्लर विक्रीसह होलसेल भावात फटाके विकुन तालुक्यासह गावागावांतील आपल्या नियमित व्यापा-यांना विना परवान्याचे, प्रतिबंधित फटाके अनधिकृतपणे विकले जात असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याआधी प्रशासनाने या गंभीर प्रकारांची दखल घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

बाभुळगाव शहरासह तालुक्यातील अनेक ठिकाणी अश्या होलसेल फटाके विकणा-यांनी आपले बस्तान मांडून फटाक्यांची सर्रास विक्री सुरू केली आहे. फटाके विक्रीसाठी आवश्यक असलेला परवाना, गोडावून, दुकानाची सोयी सुविधांसह व्यवस्था या सर्व नियमांना धाब्यावर बसवून राजरोसपणे मागेल त्याला फटाके विकण्याचा गोरखधंदा सुरू झाला आहे.



संग्रहित

चक्क किराणा दुकानातूनही फटाकेविक्री

काहींनी तर आपल्या किरणा सदृष्य असलेल्या दुकानांमध्येच फटाक्यांची विक्री करीत असल्याचे दिसून आले आहे. या फटाक्यांमध्ये शासनाने ध्वनी व वायु प्रदुषणाचे उल्लंघन करणा-या १०० डेसीबेलच्यावर क्षमता असलेल्या प्रतिबंधीत फटाक्यांचा व इतरही प्रतिबंधीत फटाक्यांचा सुद्धा समावेश असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे शासन कठोर नियम करून नागरीकांना सतर्क करीत असताना दुसरीकडे काही अर्थपिपासु फक्त पैसा कमाविण्याच्या उद्देशाने नागरिकांच्या जीवाशी खेळत असलेले दिसून येत आहेत.

ध्वनी प्रदुषणामुळे आरोग्य संकटात

मोठ्या आवाजाच्या फटाक्याने कानांच्या समस्या, हृदय विकाराची समस्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिवाळी सण साजरा करणे हे सर्व भारतीयाचा अधिकार असला तरी आपले आरोग्य आपल्या हाती हा मंत्र सुद्धा पाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आता या प्रकरणी एसडीओंसह तहसीलदार, नगरपंचायत मुख्याधिकारी व पोलीस प्रशासनाने अश्या विना परवाना, अनधिकृतपणे फटाके विकणा-यांच्या दुकाने, गोडावून, जागांची तपासणी करून त्यांचेवर कठोर कारवाईची मागणी जनतेतून होत आहे. अवैध व अनधिकृत फटाक्यांच्या विक्रीला वेळीच लगाम लावणे गरजेचे झाले आहे.

Navsanjeevan Shikshan Prasarak Mandal's Darwha
SUMITRABAI THAKARE COLLEGE OF NURSING
Plot No - P2, MIDC Area, Darwha Road, Lohara (Bhoyar), Yavatmal-445001
College Code-9218

Admission Schedule for Institutional Level Round-No. 2nd for Government/ Private Unaided / Minority B.Sc. Nursing Colleges For Academic Year 2026-27

Application invited from Eligible MH-BSc. Nursing CET / PCB registered candidate's for admission to Basic B.se (Nursing), under Institute Level round / Management Quota. The schedule of filling these seats are as follows

VACANT SEAT

Quota	Vacant Seat	Caste Category
State Quota	1	SC
	1	SEBC
	1	EWS
	3	Open

The eligible desirous candidate must apply in person / any person to respective college in prescribe format.	08/11/2026 to 10/11/2026 upto 05.30 pm
Cut-off date of admission for B.Sc. Nursing Course for Academic Year 2025-26 as per Indian Nursing Council.	15/11/2026

Contact No.
9405339337 / 9284959474 / 7066608961

PRINCIPAL
Smt. Sumitrabai Thakre
College of Nursing Yavatmal

पान १ वरून

'झेडपी' सिंचनचे साडेपाच ...

अभियंत्यांनी झालेल्या कामांचे रेकॉर्ड केले नाही. आरए बिलासह अन्य बाबींकडे डोळेझाक केली. ३१ मार्चला व्हीपीडीए अर्थात आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रणाली व झेडपी एफएमएस (फंड मॉनिटरींग सिस्टम) मध्ये वित्त विभागाने देयक काढण्याची प्रक्रिया चालविली होती. मात्र, ९.३० वाजता ही सिस्टम बंद झाल्यानंतर सिंचनच्या प्रतापी अभियंत्यांनी चक्क १०.३० वाजता जीओ टॅगिंग केलेले फोटो टाकण्याचा प्रताप केला. मात्र, या बेफिकिरीत सिंचनचे तब्बल पाच कोटी ४४ लाख १७ हजार १४३ रुपये समर्पित झाले. आता हा निधी सरकारच्या मान्यतेशिवाय काढता येत नाही. कंत्राटदारांची कोट्यवधींची देयके रखडली आहेत. सिंचनचे प्रभारी कार्यकारी अभियंता गोळे यांनी व्यपगत झालेल्या ४९ कामांसाठी चार कोटी ६१ लाख ३४ हजार ८३० रुपयांचा निधी मागण्यासाठी आता खटाटोप चालविला आहे. सिंचन विभागातील हा गोंधळ कमालीचा संतापजनक आहे. त्यावर सीईओंनी निधी व्यपगत का झाला, या दृष्टीने कार्यकारी अभियंत्यांना खुलासाही मागितल्याची माहिती आहे. मात्र, सीईओ अत्यंत नवखे असून अनुभवात ते कमी पडत आहेत हे विशेष.

'सेस'निधी विनियोगात समाजकल्याण ...

सर्व बाबींचे कामकाज हा कर्मचारी अदृश्यपद्धतीने हाताळतो. वसुलीचे सुजिततंत्र त्याने आत्मसात केल्याची चर्चा आहे. एकंदरीतच विभागात नव्याने आलेल्या अधिकाऱ्यांसोबतही हा कर्मचारी लगेच संधान साधतो. दरम्यान २०२६-२७ मध्ये सेसच्या २० टक्के निधीतून १० कोटी ४३ हजारांची तरतूद १९ योजनांसाठी झाली. त्यात मागासवर्गीय महिलांना ९० टक्के सुटीवर शिलाई मशीन पुरविणे, टीनपत्रे पुरविणे, शेतकऱ्यांना पीव्हीसी पाइप, भजनी साहित्य, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सायकल पुरविणे, ऑईल इंजिन पुरविण्यासह ९० टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे, जाहीरात व प्रसिद्धीसाठी २० हजार, स्पर्धात्मक परीक्षेकरिता अनुदान व ग्रंथालय तथा अत्यावश्यक साहित्य पुस्तकांचा पुरवठा व वाचनालय दालन बनविणे, तुषारसंच, इलेक्ट्रीक मोटारपंप, बचतगटांना बिछायत व कॅटरींग साहित्य पुरविणे, झेरॉक्स मशीन अशा कामांचा समावेश आहे. चक्क नोव्हेंबर महिना लागत असताना या विभागाचे निधी खर्चाचे कुठलेही नियोजन नाही.

महागावात २६१ क्विंटल रेशनचा ...

लक्ष्मण चव्हाण आणि पोलीस उपनिरीक्षक किशोर मुरकुटे यांच्या पथकाने पाहणी केली असता गोण्या जुन्या व वापरलेल्या असल्याचे आढळले. हा तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीतील असल्याचे स्पष्ट झाले.जप्त तांदळाची किंमत ७ लाख ५४५ रुपये तर बारदानाची किंमत २० हजार रुपये आहे. ट्रक मालक शेख अतीक शेख खदीर याच्यासह तांदळाचे मालक रोहित गोयंका, बालाजी जाधव आणि हरजी राजेगोरे अशी एकूण पाच जणांची नावे समोर आली आहेत.या प्रकरणी पुरवठा निरीक्षक एम. एम. कोल्हे यांच्या फिर्यादीवरून आवश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे. हा तांदूळ कुठून आणला आणि कुठे नेला जात होता, याचा तपास सुरू आहे. ही कार्यवाही पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक धिरज बांडे, पोउपनि अमोल राठोड, पुरवठा अधिकारी सहाय्यक फौजदार मुन्ना आडे, संतोष भोरगे,तेजाब रणखांब, सुभाष जाधव,रमेश राठोड,सुनिल पंडागळे, ,रविंद्र शिरामे राजेश जाधव यांनी केली आहे.

अग्निशस्त्रासह तिघे गुन्हे शाखेच्या ...

पंचासमक्ष दुचाकीवरील व्यक्तीना नावे विचारली. ॲक्सेस मोपेडवरील इसमाने त्याचे नाव परसराम कदम व दुसऱ्याने विक्की दिवटे असे सांगितले. तर मॅस्टीरीओ वाहनावरील इसमाने त्याचे नाव संजय आडे असे सांगितले. दरम्यान एमएच २९/सीएच १७०३ या वाहनाची डिक्की उघडून बघितली असता त्यामध्ये एका बॅगमध्ये एक लोखंडी देशी बनावटीचे पिस्टल मॅक्झिनसह दोन जीवंत काडतूस आढळले. पथकाने या अग्नीशस्त्रासह इतर असा दोन लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध शस्त्र बंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात,गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय मनीष गावंडे, गजानन राजमल्लू, पीएसआय सागर इंगळे, सफौ अजय डोळे, प्रशांत हेडाऊ, रुपेश पाली, निलेश राठोड, मिलिंद दरेकर, आकाश सूर्यवंशी, यांनी केली.

विकासाचा कणा खिळखिळा; ...

असल्याचे कंत्राटदारांनी दै. लोकसूत्रला सांगितले. दरवर्षी निघणारी नवीन टेंडर अंदाजे १५ हजार कोटींची असतात. उपलब्ध बजेटमधून नवीन कोणतेही दायित्व निर्माण न करता संपूर्ण रक्कम जुन्या देयकांसाठी वापरली, तरीही हे एक लाख कोटींचे डोंगर उपसण्यासाठी ५ वर्षे लागतील असा आलेखही कंत्राटदारांनी समजावून सांगितला.

विजेच्या लपंडावाने रब्बी पिके धोक्यात, **शेकडो शेतकऱ्यांची महावितरणवर धडक**

दुष्काळात वीजपुरवठ्याचाही झटका!

केशव सवळकर

फुलसावंगी : एकीकडे निसर्गाच्या अवकृपेने खरीप हंगाम हातचा गेला, तर दुसरीकडे रब्बी हंगामातील पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. मात्र, महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्याने शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. त्यामुळे महावितरणच्या नियोजनशून्य कारभाराविरोधात टाकळी, नारळी आणि आमडापूरच्या शेकडो संतप्त शेतकऱ्यांनी फुलसावंगीतील महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा काढून प्रशासनाला जाब विचारला.

चालू वर्षातील प्रतिकूल हवामान आणि दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे शेतकऱ्यांची उरलीसुरली आशा आता रब्बी हंगामावर टिकून आहे. विहिरी व कूपनलिकांमध्ये उपलब्ध असलेल्या मर्यादित पाण्याच्या आधारावर शेतकरी पिके जगविण्याचा प्रयत्न करीत आहेत.



मात्र, महावितरणकडून कोणतेही निश्चित वेळापत्रक न पाळता वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने सिंचनाचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. कधी दिवसा तर कधी रात्री अचानक वीज गायब होत असल्याने शेतकऱ्यांना रात्रभर शेतात जागूनही पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याची व्यथा आंदोलकांनी मांडली.

रास्तारोकोसह कार्यालयाला टाळे ठोकू!

शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये. तातडीने वीजपुरवठा सुरळीत न केल्यास येत्या काळात महावितरण प्रशासनाविरोधात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. प्रसंगी रस्ता रोको करून महावितरण कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल, असा स्पष्ट इशारा टाकळी, नारळी व आमडापूर येथील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

शेतकऱ्यांच्या समस्या सोडवू : डोंगरे

_आज फुलसावंगी विद्युत उपकेंद्रावर आलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या आहेत. लवकरच त्यावर तोडगा काढून शेतकऱ्यांचे समाधान केले जाईल, अशी प्रतिक्रिया फुलसावंगी उपकेंद्राचे महावितरणचे उपअभियंता राहुल डोंगरे यांनी दै. लोकसूत्रला दिली.

फुलसावंगी केंद्रावरून ४२ गावांना वीजपुरवठा

फुलसावंगी विद्युत उपकेंद्रावरून परिसरातील सुमारे ४२ गावांना वीजपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. तांत्रिक बिघाड आणि भारनियमनाच्या नावाखाली अवेळी वीजकपात होत असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना महावितरणच्या अनियमित कारभाराचा अतिरिक्त फटका बसत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

काय आहेत शेतकऱ्यांच्या मागण्या ?

कार्यालयावर धडकलेल्या शेतकऱ्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना धारेवर धरत वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर जाब विचारला. शेतीसाठी निर्धारित वेळेत अखंडित आणि पूर्ण दाबाने वीजपुरवठा करावा, वारंवार होणारी वीजकपात तातडीने थांबवावी आणि विस्कळीत झालेले वेळापत्रक पूर्ववत करावे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

अखेर ४० कोटींचा विद्युत आदेश नपने केला रद्द

लोकसूत्र प्रतिनिधी

नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर

यवतमाळ : राज्य शासनाने नगरपरिषदेला विद्युत उपकरण तसेच पथदिवे लावण्या संदर्भातला ४० कोटींचा खर्च करावा, असा आदेश दिला होता. याबाबत नगरपरिषदेला पत्रही पाठविण्यात आले. मात्र, कारण नसताना हा भुर्दंड नगरपरिषदेवर कशाला, असा प्रश्न विरोधकांनी करीत हा आदेश रद्द करावा, अशी मागणी केली होती. यावर दै.लोकसूत्रने बातमी प्रकाशित केली होती.

नगरपरिषदेमध्ये आज सर्वसाधारण सभेचे आयोजन नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या सभेमध्ये एकूण ३० विषय पटलावर घेण्यात आले. या सर्व विषयावर चर्चा करीत असताना यातील अतिमहत्त्वाचा विषय म्हणून शासनाने दिलेल्या ४० कोटी विद्युतीकरणावर खर्च करावे, या पत्रावरचा होता. दरम्यान, शासनाच्या या आदेशावर विरोधकांनी सुरुवातीपासूनच विरोध केला होता. मात्र, राज्यात महायुतीचे सरकार आणि नगरपरिषदमध्ये ही त्यांची सत्ता यामुळे सत्तेतील नगरसेवकांना या विषयावर बोलता येत नव्हते. वास्तविक पाहता त्यांचाही याला प्रचंड विरोध होता. कारण ४० कोटी नगरपरिषदेच्या तिजोरीतून जाणार होते आणि त्याचा भार यवतमाळकरांच्या करावर पडणार होता. जर तेवढा पैसा खर्च केला असता तर नगरपरिषद कराच्या माध्यमातून आम जनतेकडून हा पैसा वसूल करणार होती. याबाबतचे वृत्त दै. लोकसूत्रने प्रकाशित केल्यानंतर हा विषय मोठ्या प्रमाणात शहरात आणि नगरसेवकांमध्ये चर्चेला आला. कोणत्याही परिस्थितीत सर्व नगरसेवकांनी ४० कोटींचा खर्च नको यावर एकमत केले आणि विरोध केला हा विषय तिसऱ्यांदा पटलावर आला. यानंतर हा विषय पुन्हा पटलावर येऊ नये, अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला.

या सर्वसाधारण सभेत शहरातील पाणीटंचाई संदर्भात चर्चा झाली यामध्ये ज्या ठिकाणी बोरवेल आहे , त्या ठिकाणी मोटरपंप लावणे आणि नागरिकांना पाण्याची व्यवस्था करून देणे यावर भर देण्यात आला. याशिवाय शहरातील स्वच्छता, कचरा निर्मूलन, सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था, कुत्रे पकडण्याची मोहीम, रस्त्यावरील जनावर, विहिरींचे अधिग्रहण करणे, वेळ पडल्यास टँकरने पाणीपुरवठा करण्यासंदर्भात भाडेतत्त्वावर टँकर घेणे, यासारख्या विषयांवर चर्चा करण्यात आली. या सभेमध्ये एकूण ३० विषय पटलावर घेण्यात आले. या सर्व विषयावर चर्चा करीत असताना यातील अतिमहत्त्वाचा विषय म्हणून शासनाने दिलेल्या ४० कोटी विद्युतीकरणावर खर्च करावे, या पत्रावरचा होता. दरम्यान, शासनाच्या या आदेशावर विरोधकांनी सुरुवातीपासूनच विरोध केला होता. मात्र राज्यात महायुतीचे सरकार आणि नगरपरिषदमध्ये ही त्यांची सत्ता यामुळे सत्तेतील नगरसेवकांना या विषयावर बोलता येत नव्हते. वास्तविक त्यांचाही याला प्रचंड विरोध होता. कारण ४० कोटी नगरपरिषदेच्या तिजोरीतून जाणार होते आणि त्याचा भार यवतमाळकरांच्या करावर पडणार होता. जर तेवढा पैसा खर्च केला असता तर नगरपरिषद कराच्या माध्यमातून आमजनतेकडून हा पैसा वसूल करणार होती.

याबाबतचे वृत्त दै.लोकसूत्रने प्रकाशित केल्यानंतर हा विषय मोठ्या प्रमाणात शहरात आणि नगरसेवकांमध्ये चर्चेला आला. कोणत्याही परिस्थितीत सर्व नगरसेवकांनी ४० कोटींचा खर्च नको यावर एकमत केले आणि विरोध केला हा विषय तिसऱ्यांदा पटलावर आला. यानंतर हा विषय पुन्हा पटलावर येऊ नये, अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला. या सर्वसाधारण सभेत शहरातील पाणीटंचाई, संदर्भात चर्चा झाली यामध्ये ज्या ठिकाणी बोरवेल आहे त्या ठिकाणी मोटरपंप लावणे, आणि नागरिकांना पाण्याची व्यवस्था करून देणे, यावर भर देण्यात आला. याशिवाय शहरातील स्वच्छता, कचरा निर्मूलन, सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था, कुत्रे पकडण्याची मोहीम, रस्त्यावरील जनावर, विहिरींचे अधिग्रहण करणे, वेळ पडल्यास टँकरने पाणीपुरवठा करण्यासंदर्भात भाडेतत्त्वावर टँकर घेणे, यासारख्या विषयावर चर्चा करण्यात आली.

खैरीतील गोठाडीत चोरी

राळेगाव : तालुक्यातील खैरी येथील गोठाडी मध्ये अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना उघडकीस आली असून, यामध्ये इंजिन ऑइलच्या सात पेट्या आणि अपोलो कंपनीचे सात टायर असा एकूण ३२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. ही घटना २८ ऑक्टोबरच्या सकाळी ६ वाजता उघडकीस आली.

अक्षय महादेव जमदापुरे (२९) असे फिर्यादीचे नाव आहे. यामध्ये चोरट्यांनी सात पेट्या इंजिन ऑइल, तीन समोरील टायर आणि चार मागील टायर असा मुद्देमाल चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे. इंजिन ऑइलच्या सात पेट्यांची किंमत सुमारे २१ हजार रुपये, तीन समोरील टायरची किंमत ४ हजार ५०० रुपये, तर चार मागील टायरची किंमत ७ हजार २०० रुपये असल्याने एकूण ३२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. वडकी पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

'आम्ही पुसदकर सोशल फाउंडेशन'चे पोलिसांना निवेदन

कायमस्वरूपी पार्किंग हटविण्याचीही मागणी

मुख्य बाजारपेठेत वाहनबंदीसाठी टाहो

लोकसूत्र प्रतिनिधी

पुसद : दिवाळीच्या खरेदीसाठी शहरातील मुख्य बाजारपेठेत वाढणारी गर्दी आणि अरुंद रस्त्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता, सुभाषचंद्र बोस चौक ते नगीना मशीद चौकमार्गे सोनार लाईन ते महावीर चौक या मार्गावरील तीनचाकी व चारचाकी वाहनांची वाहतूक दिवाळीची गर्दी संपेपर्यंत बंद करावी, अशी मागणी 'आम्ही पुसदकर सोशल फाउंडेशन'ने केली आहे.

यासंदर्भात एसडीपीओ अमर मोहिते यांच्याकडे स्वाक्षऱ्यांसह निवेदन सादर केले. त्यांच्या वतीने एपीआय कदम यांनी निवेदन स्वीकारले.सदर मार्ग अरुंद असल्याने रिक्षा व चारचाकी वाहनांमुळे वारंवार वाहतूक कोंडी होते. याचा फटका महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक,



व्यापारी आणि ग्राहकांना बसत आहे. त्यामुळे संबंधित मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून वाहनबंदीचा निर्णय घ्यावा, रस्त्यावरील कायमस्वरूपी उभी असलेली वाहने हटवून दुचाकी व पादचाऱ्यांसाठी सुरळीत वाहतूक व्यवस्था करावी, अशा मागण्या निवेदनातून केल्या आहेत.ही मागणी व्यापारी किंवा ग्राहकांच्या विरोधात नसून बाजारपेठ सुरक्षित व कोंडीमुक्त ठेवण्यासाठी असल्याचे फाउंडेशनने स्पष्ट केले. निवेदनावर संजय बजाज, अजय पुरोहित, ओमप्रकाश शिंदे, महेश मस्के, निखिल गादेवार, विनोद जिल्हेवार, महेश काळे, संजय लोंढे, सुभाष जाधव, संतोष आर्य, संतोष भालेराव, अविनाश साखरे, सय्यद नायब हबीब, रमेश लाल सोमानी, अमोल साखरे, पंजाब भोयर, ओम साखरे, प्रशांत राजे, मुकुंद पांडे, मनोज जाधव, बाळासाहेब उखळकर, रेश्मा लोखंडे, सीमा पापीनवार, सुरेश तिवारी, माधव भरगाडे व गोविंदराव कुकडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जाचाला कंटाळून 'त्या' प्राध्यापकाची मुदतपूर्व निवृत्ती

लोकसूत्र प्रतिनिधी

प्राचार्याच्या हेकेखोरीवर अंतर्गत धुसफूस

कळंब : राळेगाव रोडवरील 'त्या' महाविद्यालयाच्या अनागोंदीच्या मालिका संपन्याचे नाव घेत नाही, शिक्षणाचे दाते म्हणवून स्वयंघोषित शिक्षणमहर्षी होऊ पाहणाऱ्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्याला महाविद्यालयातीलच प्राध्यापक, कर्मचारी त्रासले आहे. प्राचार्याच्या हेकेखोरिला कंटाळून वर्षभरापूर्वी एका प्राध्यापकाच्या सेवेच्या स्वेच्छानिवृत्तीची 'शाम' (संध्याकाळ) झाली.

प्राध्यापकाच्या सेवानिवृत्तीनंतरही महाविद्यालयाने त्या प्राध्यापकासोबतची हेकेखोरी कायम ठेवली आहे. वर्ष लोटूनही त्या प्राध्यापकाचे जिपिएफ व पेन्शन महाविद्यालयाने रोखून धरली आहे. महाराष्ट्रात अनेक लोकांनी शिक्षणाचे जाळे विनले, घरेदारे, संपत्ती विकून थोरपुरुषांनी समाज शिक्षित होण्यासाठी मोठे प्रयत्न केले, मात्र महाराष्ट्राला अशा थोरपूरुषाचा वारसा असताना कळंब तालुक्यात त्यांच्या विचाराला काळीमा फासली जातं आहे. नावापुरत्या जयंत्या साजऱ्या करून प्रत्यक्षात कष्टकरी शेतकरी, शेतमजूरांच्या मुलांचे शुल्काच्या माध्यमातून लचके तोडले आहे. मोफत प्रवेश असताना बणावट पावती देऊन त्यांच्याकडून हजारो रुपये रक्कम महाविद्यालयाने ओरबडली आहे. त्यातच महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसोबतच काही प्राध्याकांची देखील जिरवणे सुरु केले असुन काही प्राध्यापकांचा मानसिक छळ संस्थेकडून सुरु असल्याची चर्चा आहे. त्याच छळाला कंटाळून वर्षभरांपूर्वी एका प्राध्यापकाने स्वेच्छानिवृत्ती घेतली, मात्र आता त्यांची पेंशन आणि जिपीएफची रक्कम त्या महाविद्यालयाने रोखून धरली आहे. त्यामुळे पगाराच्या भरवश्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या सदर प्राध्यापकाच्या दैनंदिन जीवनमानाचा प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार महाविद्यालयाचे उंबरठे झिजवनाऱ्या त्या प्राध्यापकाला मानसिक व आर्थिक संकटात सदर महाविद्यालयाने ढकलल्याची माहिती आहे.

यंदा सुधारीत प्रधानमंत्री पीकविमा योजना

केशव सवळकर

जिल्ह्यासाठी इफको-टोकियो विमा कंपनी, पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के

यवतमाळ : एकीकडे गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा योजनेत वाटाण्याच्या अक्षदा मिळत आहेत. सत्ताधारी भाजपा व शिंदेसेनेत त्यावरून आरोप-प्रत्यारोपही झाले. मात्र हा विम्याचा विषय विस्मरणात गेला असताना राज्यासाठी यंदा २०२६-२७ करीता सुधारीत प्रधानमंत्री पीकविमा योजना लागू झाली. ३ जुलैच्या शासन निर्णयामुळे अधिसूचित महसूल मंडळात अधिसूचित पिकांचे चालू वर्षाचे सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत कमी आल्या तर विमा नुकसान भरपाई लागू होणार आहे.

यवतमाळचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी उपसंचालक सतिश सांगळे यांच्या स्वाक्षरीनिशी आज मंगळवारी प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले. यंदाच्या रब्बी हंगामासाठी राज्यात सन २०२६-२७ या वर्षाकरिता ही सुधारीत प्रधानमंत्री पीकविमा योजना आहे. जिल्ह्यासाठी शासनाने पुन्हा इफको-टोकियो जनरल इन्शुरंस कंपनी नेमली आहे. या योजनेत बागायती गहू, हरभरा व उन्हाळी भुईमूग समाविष्ट आहे. अंतीम मुदत बागायती गहू व हरभरा पिकासाठी १५ डिसेंबर २०२६ तर उन्हाळी भुईमूगासाठी ३१ मार्च २०२७ आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के आहे. योजनेमध्ये सहभाग घेण्यासाठी शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी हे ओळखपत्र अनिवार्य आहे. विमा भरपाईसाठी शेतकऱ्यांना डिजिटल पीक



सर्वेक्षणअंतर्गत पिकांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. सुधारीत पीकविमा योजनेमध्ये शेतकरी सहभागासाठी प्रतिअर्ज किमान ०.१० हेक्टर मर्यादा राहिल. योजनेचा चुकीच्या मार्गाने अर्ज करून गैरफायदा घेत असल्याचे निदर्शनात आल्यास त्यांना पुढील पाच वर्ष कृषीविषयक योजनांपासून वंचित रहावे लागेल. ही योजना ३ जुलैच्या शासन निर्णयान्वये अधिसूचित केलेल्या पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल.

सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी खात्यादाराच्या व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्ट्याने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहे. मात्र भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. रबी हंगामातील अधिसूचित अन्नधान्य व गळीधान्य पिकांसाठी शेतकऱ्याच्या विमा हप्ता संरक्षित रकमेच्या १.५० टक्के किंवा प्रत्यक्ष विमा हप्ता यापैकी कमी असलेली रक्कम राहील. कांदा पिकासाठी विमा हप्ता विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के राहील. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील ७ वर्षांपैकी सर्वाधिक उत्पादनाच्या ५ वर्षांचे सरासरी उत्पादन गुणिला त्या पिकाच्या जोखिमस्तर विचारत घेऊन निश्चित केले जाईल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच इतर अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल. शेतकऱ्यांना पीक विमा अर्ज https://pmfby.gov.in या संकेतस्थळावर, बँक शाखांमध्ये तसेच आपले सरकार सेवा केंद्रातर्फे सादर करता येतील. विमा अर्ज सादर करताना आधार क्रमांक, बँक खाते तपशील, जमिनीचा ७/१२ उतारा व पीक पेरणीसंबंधी आवश्यक माहिती सादर करणे आवश्यक राहील.

विमा संरक्षित रक्कम विमा हप्ता दर

पीक	जोखीम	वमा रक्कम	विमा दर	हिस्सा
गहू	७०	४२५००	१.००	४२५
हरभरा	७०	३६०००	१.५०	५४०
उन्हाळी भुईमूग	७०	४०६००	१.५०	६०९

जोखमीच्या बाबी काय ?

योजनाअंतर्गत रबी हंगामाकरिता पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम करणाऱ्या इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी पीक कापणी प्रयोग आधाराने/तांत्रिक उत्पादन आधारे सदर महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील.

कृषी अधीक्षकांचे आवाहन काय ?

चालू वर्षी हवामान खात्याने पावसासंदर्भात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण्याच्या दृष्टीने पिक विमा योजना अत्यंत महत्वपूर्ण आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक राहुल माणिकराव ठाकरे यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर ४४००१८ येथे मुद्रित करून दै. लोकसूत्र 'शिवभवन' दत्तचौक यवतमाळ-४४५००१ येथे प्रकाशित केले. कार्यकारी संपादक केशव मारोतराव सवळकर (संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) (सर्व वाद यवतमाळ न्यायालया अंतर्गत) ई-मेल : loksutra@gmail.com